**<u>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६</u>**

बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ च्या मंजूरीमधून वगळलेल्या सारभूत स्वरुपाचे ठराविक फेरबदलांना (ई.पी.) उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये मंजूरी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**क्रमांक :- टिपीबी-४३१८/६७८/प्र.क्र.११४/२०१९/नवि-११**

**मंत्रालय, मुंबई :४०० ०२१,**

**दिनांक :- ०५ नोव्हेंबर, २०२०.**

**<u>शासन निर्णय</u>** : सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( संजय बाणाईत )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

(१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

(२) मा. मंत्री ( नगर विकास ) यांचे स्वीय सहाय्यक.

**प्रति,**

(१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

(२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(३) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.

(४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.

( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी २५ प्रती १)नगर विकास विभाग नवि-११), मंत्रालय, मुंबई २) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. ३)आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई ४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व ५) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)

(५) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(६) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

**Sanction under Section 31(1) to the certain Excluded Part (E.P.) of Development Plan-2034, for Greater Mumbai.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Date :- 5th November, 2020**

## NOTIFICATION

**No. TPB-4318/678/CR-114/2019/UD-11**

Whereas, the Municipal Corporation of Greater Mumbai is the Planning Authority for jurisdiction of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Corporation ") as per the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in accordance with Sub-Section (1) of Section 31 of the Said Act, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the State Government has accorded sanction to the Draft Development Plan (Part)-2034 of Greater Mumbai in K/E, S,G/S Ward vide Notification No. TPB- 4317/629/CR-118/2017/UD-11, dated 9th November 2017 and Notification No. TPB- 4317/778/CR-267/2017/UD-11, dated 7th February, 2018;

And whereas, in accordance with provisions of sub Section (1) of Section 31 of the Said Act, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the State Government has accorded sanction to the remaining part of the Draft Development Plan-2034 alongwith Development Control and Promotion Regulations-2034 of Greater Mumbai with modification shown in SCHEDULE-A appended to the Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 excluding the substantial Modification as shown in SCHEDULE-B appended thereto read with a corrigendum and Addendum of even number dated 22/06/2018 and dated 29/06/2018 to the said Notification;

And whereas, the Government of Maharashtra has sanctioned a part of the said Draft Development Plan, while excluding substantial modifications which were published as EP for inviting objections and / or suggestions from the general public vide Notice No. TPB-4317/629/CR-118/2017/EP/UD-11, Dt. 08/05/2018 read with a corrigendum of even number dated 22/06/2018 and dated 29/06/2018 to the said Notice. And whereas the said Notice dated 08/05/2018 was published in the Maharashtra Government Gazette, Kokan Division Supplement dated 17-23 May, 2018 and a corrigendum of even number dated 22/06/2018 and dated 29/06/2018 were published in the Maharashtra Government Gazette, Konkan Division Supplement dated 30th June, 2018;

And whereas, the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai is appointed as an "Officer" to give hearings and submit his report to the Government on the objections/suggestions received by him, as per the said Notice;

And whereas, the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Mumbai has requested for sanction of certan EP of vital public importance at the earliest. And whereas, the said Officer after giving hearing in respect of the objections and / or suggestions received from the general public, on the said Excluded Part and has submitted his report to the Government vide his letter dated 25/07/2019 for said EP required to be sanctioned at the earliest. ;

And whereas, Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) vide their letter dated 11/12/2018 has requested the Government to reserve land admeasuring 43.76 ha. bearing CTS No. 657A(Part) and CTS 853(Part) of Village Kanjur for "Metro Car Depot, allied uses and Commercial".

And whereas, the Government in Urban Development Department vide Notification dated 27/12/2016, under section 40(1)(c) of the said Act, has appointed MMRDA as the Special Planning Authority (SPA) for Metro Car Depot. The said SPA area includes 41 hector land area from land bearing CTS No. 657 A,B,C,D. of Village Kanjur. And whereas, as per the request of MMRDA land bearing CTS No. 853 (part) of village Kanjur having area 2.76 Hectare is also included in SPA area vide corrigendum and addendum dated 4/11/2020 to the Notification dated 26/12/2016 by which the boundary of SPA area is modified and now the MMRDA is appointed as SPA for the area admeasuring 43.76 Hectare out of CTS No. 657A(Part) and 853(Part) of Village Kanjur;

And whereas, part of the said land is included in excluded part i.e. EP-S104, EP-S156 and EP-S144 in the Development Plan of Greater Mumbai. And Whereas, the State Government is of the opinion that considering the request of MMRDA, the Decision in respect of excluded part shown in SCHEDULE-A appended hereto needs to be sanction at the earliest.

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 31 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby:-

(1) (a) Sanctions the said Excluded Part of the said Development Plan-2034 for Greater Mumbai, as more precisely specified in Schedule- A appended hereto.

(b) Fixes the date after one month of the publication of this notification in the Maharashtra Government Gazette to be the date on which the said Excluded Parts as described in the Schedule-A shall come into force.

(2) Copy of the Plan showing the aforesaid Excluded Part as sanctioned by the State Government shall be kept open for inspection by the general public, during working hours for a period of one year in the office of the Chief Engineer

(Development Plan), Municipal Corporation of Greater Mumbai on all working days.

This Notification is also made available on the Govt. of Maharashtra website : www.maharashtra.gov.in (कायदे व नियम)

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**( Nirmalkumar Chaudhari )**
**Under Secretary to Government.**

## SCHEDULE-A

**(Appended to Government in Urban Development Department's Notification No. TPB-4318/678/CR-114/2019/UD-11, Dated - 5th November, 2020)**

**Schedule of Substantial Modifications Sanctioned by the Government under Section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 in respect of Development Plan-2034 for Greater Mumbai.**

| Excluded Part No. (EP) | Modification No. | RDDP Sheet No. | Proposal of Draft D.P. of GR. Mumbai published under section 26 of the MR & TP Act, 1966``` | Proposal of Draft D.P. of GR. Mumbai submitted under section 30 of the MR & TP Act, 1966 | Substantional Modification Published by Government Under Section 31of M.R.&T.P Act. 1966. | Substantional Modification sanctioned by Government Under Section 31of M.R.&T.P Act. 1966. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| EP-S104 | MS137 | ES42 | RR2.2 (Affordable Housing) | Part of Reservation RR2.2 (Affordable Housing) deleted and reservation of Retail Market (RSA1.2) is shown. | Modification u/s 30 is proposed to be sanctioned as shown on plan. | **Refuse to accord sanction.** |
| EP-S156 (Part) | | ES36 | ROS1.5 | ROS1.5 | Reservation of Public Housing as in SRDP 1991 on CTS no. 730, 657 and others of village Bhandup and Kanjur-E is proposed to be reinstated with change in nomenclature as RR2.2 as shown on plan. | **Refuse to accord sanction for the portion of EP included in Notified area of the MMRDA as SPA for Metro Car Depot.** |
| EP-S144 | MS179 | ES42, ES45 | -- | A label of Special Planning Authority (SPA) is shown on above land. | Modification u/s 30 is proposed to be sanctioned. | **Sanctioned as proposed with following addition.:- Part of land bearing CTS No. 853(part) of village Kanjur is also included in SPA boundary as shown on plan.** |

URBAN DEVELOPMENT DEPTT ★ MANTRALAYA MUMBAI-32 ★

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ च्या मंजूरीमधून वगळलेल्या सारभूत स्वरुपाचे ठराविक फेरबदलांना (ई.पी.) उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये मंजूरी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- ५ नोव्हेंबर, २०२०.**

## अधिसूचना

**क्रमांक :- टिपीबी-४३१८/६७८/प्र.क्र.११४/२०१९/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्राकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका (यापुढे याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करणेत आलेला आहे) हे नियोजन प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाचे कलम ३१ चे पोट-कलम (१) अन्वये योग्य ती चौकशी करुन तसेच संचालक, नगररचना,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेशी बृहन्मुंबई प्रारुप विकास योजने संदर्भात सल्लामसलत करुन के/पूर्व,एस व जी/दक्षिण प्रभागाच्या भागशः प्रस्तावाच्या संदर्भात अधिसूचना टी.पी.बी/४३१७/प्र.क्र.११८/ २०१७/नवि-११ दिनांक ०९.१०.२०१७ आणि अधिसूचना क्र.टीपीबी/४३१७/७७८/प्र.क्र.२६७/ २०१७/नवि-११ दिनांक ०७.०२.२०१८ अन्वये शासनाने मंजूरी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ चे पोट-कलम (१) अन्वये योग्य ती चौकशी करुन तसेच संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत करुन शासनाने मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या प्रारुप विकास योजना सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०३४ ला शासन अधिसूचना क्र.टीपीबी-४३१७/६२९/ प्र.क्र.११८/ २०१७/विनि/नवि-११, दिनांक ०८/०५/२०१८ सह समक्रमांकाचे दि. २२/०६/२०१८ व दि. २९/०६/२०१८ रोजीचे समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्रकान्वये सदर अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब" मध्ये नमूद केलेले मंजूरीतून वगळलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने प्रारूप विकास योजना-२०३४ ला भागश: मंजूरी देताना मंजूरीतून वगळलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल ई.पी. संबंधाने सर्वसाधारण जनतेकडून हरकती आणि/ वा सूचना मागविण्यासाठी सूचना क्र.टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/(ई.पी.)/नवि-११, दि. ८/०५/२०१८ सह शुध्दीपत्रक दि. २२/६/२०१८ व दि. २९/०६/२०१८ द्वारे प्रसिध्द करण्यात आली आहे आणि ज्याअर्थी सदरहु सूचना दि. ८/०५/२०१८ महाराष्ट्र शासनाचे राजपत्र कोकण विभाग पुरवणीमध्ये दि. १७-२३ मे, २०१८ आणि सम क्रमांकाचे शुध्दीपत्रक दि. २२/०६/२०१८ व दि. २९/०६/२०१८ ही शासनाचे राजपत्र

कोकण विभाग पुरवणीमध्ये दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी उप संचालक, नगररचना, बृहन्मुंबई यांना उक्त सुचनेनुसार प्राप्त होणा-या हरकती / सूचनांना सुनावणी देवून अहवाल सादर करणेसाठी अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक दृष्टया महत्वाचे असलेले सारभूत स्वरुपाचे ठराविक फेरबदल (ई.पी.) ला प्राथम्याने मंजूरी देणेबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी विनंती केली, आणि ज्याअर्थी, उक्त अधिकारी यांनी विकास योजना -२०३४ मधील मंजूरीतून वगळलेल्या सारभूत स्वरुपाचे फेरबदल ई.पी. संबंधी जनतेकडून प्राप्त हरकती आणि / वा सूचनादारांना सुनावणी देऊन लवकरात लवकर मंजूर होणे आवश्यक असलेल्या ई.पी. संदर्भात त्यांचेकडील दि. २५/०७/२०१९ रोजीचे पत्राद्वारे शासनास अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ( एमएमआरडीए) यांनी दि.११/१२/२०१८ रोजीचे पत्राद्वारे न.भू.क्र. ६५७अे(भाग) आणि न.भू.कर. ८५३(भाग), मौजे कांजूर येथील ४३.७६ हेक्टर क्षेत्राची जमीन "मेट्रो कार डेपो, संलग्न वापर आणि वाणिज्यिक" साठी आरक्षित करण्याबाबत शासनास विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने दि.२७/१२/२०१६ रोजीचे अधिसूचनेद्वारे न.भू.क्र. ६५७अे,बी,सी.डी, मौजे कांजूर येथील ४१ हेक्टर जमिनीसाठी मेट्रो कार डेपोसाठी उक्त अधिनियमाचे कलम ४०(१)(सी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून एमएमआरडीए ची नियुक्ती केली आहे. आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्रामध्ये न.भू.क्र. ८५३ (भाग) मौजे कांजूर येथील २.७६ हेक्टर क्षेत्र अंतर्भूत करण्यासाठी एमएमआरडीए ची विनंती पाहता. दि. २७/१२/२०१६ रोजीचे अधिसूचनेस दि.४/११/२०२० रोजी शुध्दीपत्रक व पुरकपत्र निर्गमित केले असून त्यानुसार आता एमएमआरडीए ची न.भू.क्र. ६५७अे (भाग) व ८५३(भाग) मौजे कांजूर येथिल ४३.७६ हेक्टर क्षेत्रासाठी मेट्रो कार डेपो करीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर जमिनीपैकी काही भाग हा बृहन्मुंबई विकास योजनेचे मंजूरीतून वगळलेल्या ई.पी. एस-१०४ए ई.पी. एस-१५६ (भाग) आणि ई.पी. एस-१४४ मध्ये समाविष्ट आहे. आणि ज्याअर्थी, एमएमआरडीएची विनंती विचारात घेता सोबतचे परिशिष्ट-अ मध्ये नमूद ई.पी. संदर्भात तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ चे पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारात आणि त्या अनुषंगाने असलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन शासन याद्वारे :-

१) अ) सोबतचे परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या उक्त विकास योजना-२०३४ मधील सदरहु सारभूत स्वरुपाच्या बदलांना (ई.पी.) मान्यता देण्यात येत आहे.

ब) उक्त परिशिष्ट-अ नुसार मंजूरी दिलेल्या सारभूत स्वरुपाचे बदल (ई.पी.) सदरहु अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसानंतर अंमलात येतील.

URBAN DEVELOPMENT DEPTT

२) विकास योजना-२०३४ मधील शासनाने मंजूर केलेले सारभूत स्वरुपाचे बदल (ई.पी.) मंजूरीच्या नकाशाची प्रत सर्वसाधारण जनतेच्या निरिक्षणासाठी प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१ यांचे कार्यालयात सर्व कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे व नियम ) या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

URBAN DEVELOPMENT DEPTT MANTRALAYA, MUMBAI-32

( निर्मलकुमार पं. चौधरी )
अवर सचिव महाराष्ट्र शासन

**परिशिष्ट - अ**

( नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक :- टिपीबी ४३१८/६७८/ प्र.क्र. ११४/२०१९/नवि-११,
दिनांक- ५ नोव्हेंबर, २०२० सोबतचे परिशिष्ट )

**बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ च्या मंजूरीमधून वगळलेल्या सारभूत फेरबदलास (ई.पी.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये मंजूरीचे अधिसूचने सोबतचे परिशिष्ट.**

| **Excluded Part No. (EP)** | **Modification No.** | **RDDP Sheet No.** | **Proposal of Draft D.P. of GR. Mumbai published under section 26 of the MR & TP Act, 1966```** | **Proposal of Draft D.P. of GR. Mumbai submitted under section 30 of the MR & TP Act, 1966** | **Substantional Modification Published by Government Under Section 31of M.R.&T.P Act. 1966.** | **Substantional Modification sanctioned by Government Under Section 31of M.R.&T.P Act. 1966.** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| EP-S104 | MS137 | ES42 | RR2.2 (Affordable Housing) | Part of Reservation RR2.2 (Affordable Housing) deleted and reservation of Retail Market (RSA1.2) is shown. | Modification u/s 30 is proposed to be sanctioned as shown on plan. | **Refuse to accord sanction.** |
| EP-S156 (Part) | | ES36 | ROS1.5 | ROS1.5 | Reservation of Public Housing as in SRDP 1991 on CTS no. 730, 657 and others of village Bhandup and Kanjur-E is proposed to be reinstated with change in nomenclature as RR2.2 as shown on plan. | **Refuse to accord sanction for the portion of EP included in Notified area of the MMRDA as SPA for Metro Car Depot.** |
| EP-S144 | MS179 | ES42, ES45 | -- | A label of Special Planning Authority (SPA) is shown on above land. | Modification u/s 30 is proposed to be sanctioned. | **Sanctioned as proposed with following addition.:- Part of land bearing CTS No. 853(part) of village Kanjur is also included in SPA boundary as shown on plan.** |